MHSO110018802024

**नियमित दिवाणी दावा क्र. ६६७/२०२४**

(राहुल सावंत वि. बाजीराव सावंत व इतर)

**<u>निशाणी क्र. २६ खालील आदेश</u>**

**१.** वादीने सदरचा अर्ज वादी यांचे विरुध्द दावा अबेट झाल्याचा आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २ आण्णा कृष्णा सावंत हे दि. २२/१०/२०२४ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादींच्या वारसांना दावा पुढे चालविण्याचा अधिकार असल्यामुळे त्यांनी सदरचा अबेटमेंट चा आदेश रद्द करुन मिळणेसाठी हा अर्ज दाखल केला आहे.

**२.** प्रतिवादी यांनी सदर अर्जाला म्हणणे दाखल केले नाही. अर्ज विना म्हणणे चालविण्यात येतो.

**३.** दाव्याचे योग्य ते निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणदोषावर चालविण्यासाठी प्रतिवादी यांचे वारस रेकार्डवर असणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचे वारस रेकार्डवर घेणे उचित ठरते. परंतु तत्पुर्वी अबेटमेंट आदेश रद्द करणे गरजेचे आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज रक्कम प्रत्येकी रुपये ५००/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीनी खर्चाची रक्कम प्रतिवादींना पुढील तारखेपर्यंत दयावी.

३. वादीने वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर प्रतिवादींविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GULFARAZ MAQSOOD BIRADAR
Date: 2026.04.15 18:48:38 +0530

(जी. एम. बिरादार)

दिनांकः– १५.०४.२०२६ ३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माळशिरस

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | P. S. Kore |
| Court | - | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Malshiras |
| Date of Judgment/Order | - | 15.04.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 15.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 15.04.2026 |